रयत शिक्षण संस्थेचे

# सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज



## ग्रंथालय विभाग

---

दिनांक : २१/०९/२०२६

### सूचना
### कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन – २०२६

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षणमहर्षी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने ‘कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन-२०२६’ या विशेष ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याशी संबंधित जुने व महत्त्वपूर्ण ग्रंथ तसेच त्यांच्या कार्याची व विचारांची माहिती देणारे साहित्य प्रदर्शित करण्यात येणार आहे. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी या विशेष ग्रंथ प्रदर्शनास आवर्जून भेट देऊन कर्मवीरांच्या जीवनकार्याचा व विचारांचा परिचय करून घ्यावा, तसेच प्रदर्शनाचा शैक्षणिक लाभ घ्यावा. ग्रंथालय विभागाच्या वतीने सर्वांचे हार्दिक स्वागत.

कार्यक्रमाची माहिती

दिनांक : बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६
वेळ : सकाळी ०९.०० वा.
स्थळ : अभ्यासिका, पहिला मजला, मुख्य इमारत

ग्रंथपाल
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय
(कला,वाणिज्य व विज्ञान)
उंब्रज,ता.कराड,जि.सातारा-४१५१०१

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

## रयत शिक्षण संस्थेचे

# सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय,

**उंब्रज, ता. कराड, जि. सातारा**

## “कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन-२०२६”

आपल्या सर्वांचे






प्रदर्शन स्थळ: पहिला मजला, अभ्यासिका

जय कर्मवीर





“विद्यार्थी हा स्वाभिमानी असला पाहिजे. तो न्यायाची चाड आणि अन्यायाची चीड बाळगणारा हवा.”

-कर्मवीर भाऊराव पाटील

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षण महर्षी

# पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त

## ग्रंथालय विभाग

आयोजित

## “कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन-२०२६”

बुधवार, दि. २३ सप्टेंबर, २०२६, वेळ: सकाळी ०९.०० वा.

उद्घाटन हस्ते

**मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे**
ऑडीटर
रयत शिक्षण संस्था, सातारा

**मा. श्री. एन. टी. निकम**
सहाय्यक विभागीय अधिकारी
रयत शिक्षण संस्था, सातारा

प्रमुख उपस्थिती

**मा. प्रकाश चव्हाण**
जनरल बॉडी सदस्य
रयत शिक्षण संस्था, सातारा



प्रा. विकास बर्गे
ग्रंथपाल

प्रा. घनश्याम गिरी
उपप्राचार्य

डॉ. संभाजी गावडे
प्र. प्राचार्य



रयत शिक्षण संस्थेचे

# सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय

# उंब्रज, ता.-कराड, जि.- सातारा



रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षण महर्षी

# पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

यांच्या १३९ व्या जयंती निमित्त विशेष व्याख्यान कार्यक्रम

## “कर्मवीर जयंती सोहळा -२०२६”

### कार्यक्रम पत्रिका

| | |
|---|---|
| **प्रतिमा पूजन** | **मान्यवरांच्या हस्ते** |
| **स्वागतगीत** | **गायक समूह** |
| **प्रास्ताविक** | **मा. डॉ. संभाजी गावडे** |
| **मान्यवरांचा परिचय** | **मा. श्री. वैभव उमरदंड** |
| **प्रमुख मार्गदर्शक** | **मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे**<br>ऑडीटर,<br>रयत शिक्षण संस्था, सातारा |
| **अध्यक्ष** | **मा. श्री. एन. टी. निकम**<br>सहाय्यक विभागीय अधिकारी<br>रयत शिक्षण संस्था, सातारा |
| **आभार** | **मा. सौ. सुनिता पाटील** |

स्थळ : सभागृह, दुसरा मजला

बुधवार, दिनांक : २३ सप्टेंबर, २०२६ वेळ : सकाळी ०९.०० वा.

''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद''
- कर्मवीर





## रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षण महर्षी

## पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील (डी.लिट्)

# यांची १३९ वी जयंती

स.न.वि.वि., बुधवार दि. २३/०९/२०२६ रोजी सकाळी ९.०० वा.

* **प्रमुख अतिथी- मा.प्रा.डॉ. राजेंद्र मोरे** (ऑडीटर, रयत शिक्षण संस्था सातारा )

* **अध्यक्ष - मा.श्री.एन.टी.निकम** सहाय्यक विभागीय अधिकारी, रयत शिक्षण संस्था, सातारा

### * प्रमुख उपस्थिती *

**मा.प्रकाश चव्हाण,** जनरल बॉडी सदस्य, र.शि.सं.सातारा.

**मा.अजितराव जाधव**
सदस्य, स्कुल कमिटी
एस.आर.पी.के. विद्यालय
एम.जी.एम.यु.विद्यालय, उंब्रज

**मा.संजय पाटील**
सदस्य,स्कुल कमिटी
एस.आर.पी.के. विद्यालय, उंब्रज

**मा.विजयसिंह जाधव**
सदस्य, स्कुल कमिटी
आर.ई.एम. स्कुल, उंब्रज

**मा.प्रा.तानाजी कदम**
निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती
एस.एम.आर.जे. महाविद्यालय, उंब्रज

**मा.प्रल्हाद जाधव**
निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती
एस.एम.आर.जे. महाविद्यालय, उंब्रज

**मा.जयंतराव जाधव**
सदस्य, महाविद्यालय विकास समिती व स्कुल कमिटी
एस.एम.आर.जे. महाविद्यालय, एम.जी.एम.यु.विद्यालय
एस.आर.पी.के. विद्यालय, उंब्रज

**मा.माणिक डुबल**
सदस्य,स्कुल कमिटी
एस.आर.पी.के. विद्यालय, उंब्रज

**मा.राजवैभव जाधव**
सदस्य,स्कुल कमिटी
एम.जी.एम.यु.विद्यालय, उंब्रज

**मा.चंद्रकांत चव्हाण**
निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती
एस.एम.आर.जे. महाविद्यालय, उंब्रज

**मा.दिनेश कदम**
निमंत्रित सदस्य, महाविद्यालय विकास समिती
एस.एम.आर.जे. महाविद्यालय, उंब्रज

**मा.डॉ.सुनिल कोडगुले,**
निमंत्रित सदस्य, एस.आर.पी.के. विद्यालय, उंब्रज

या मान्यवरांच्या उपस्थितीत समारंभ संपन्न होत आहे. तरी आपली उपस्थिती प्रार्थनीय आहे.

* कार्यक्रमाचे स्थळ : सभागृह, सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

### * आपले स्नेहांकित *

**मा.सौ. फातिमा पटेल**
मुख्याध्यापिका,
रयत इंग्लिश मेडियम स्कूल,
उंब्रज.

**मा.सौ. सुनिता पाटील**
मुख्याध्यापिका,
श्रीमती रुक्मिणीबाई पांडुरंग कदम
कन्या विद्यालय, उंब्रज.

**मा.वैभव उमरदंड**
मुख्याध्यापक
महात्मा गांधी माध्यमिक व
उच्च माध्यमिक विद्यालय, उंब्रज.

**मा.डॉ.संभाजी गावडे**
प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज.

**महाविद्यालय विकास समिती, शाळा समिती, शिक्षक, शिक्षकेतर सेवक,
विद्यार्थी-विद्यार्थिनी, ग्रामस्थ, रयत शैक्षणिक संकुल, उंब्रज.**

## कार्यक्रम अहवाल

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षणमहर्षी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन-२०२६ व 'एकाग्रता आणि स्मरणशक्ती' भित्तीपत्रिका अनावरण करण्यात आले. कालावधी: दि. २३ व २४ सप्टेंबर २०२६, स्थळ: महाविद्यालयीन ग्रंथालय विभाग / अभ्यासिका, पहिला मजला, मुख्य इमारत

---

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षणमहर्षी, पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली करून शिक्षणाच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी केली. त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व परिवर्तनवादी विचारांचा विद्यार्थ्यांना परिचय व्हावा आणि त्यांच्या कार्यातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी, या उद्देशाने त्यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे, कर्मवीरांच्या विचारांचा परिचय करून देणे, त्यांच्या जीवनकार्याचे महत्त्व समजावून देणे तसेच विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेला उपयुक्त ठरणाऱ्या विषयांवर माहितीपर उपक्रम राबविणे, या व्यापक उद्देशाने 'कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन-२०२६' आणि 'एकाग्रता आणि स्मरणशक्ती' या विषयावरील भित्तीपत्रिकेचे अनावरण आयोजित करण्यात आले.

**कार्यक्रमाची उद्दिष्टे**

१. विद्यार्थ्यांना डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याची व विचारांची ओळख करून देणे.

२. कर्मवीरांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्यातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळवून देणे.

३. कर्मवीरांच्या जीवनकार्यावरील जुने व महत्त्वपूर्ण ग्रंथ विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे.

४. विद्यार्थ्यांमध्ये वाचनसंस्कृती आणि ग्रंथालय वापराची सवय वाढविणे.

५. ऐतिहासिक व संदर्भमूल्य असलेल्या ग्रंथांचे जतन व प्रदर्शन करण्याचे महत्त्व अधोरेखित करणे.

६. विद्यार्थ्यांना एकाग्रता व स्मरणशक्ती यासंबंधी उपयुक्त माहिती उपलब्ध करून देणे.

७. अध्ययन करताना एकाग्रता, स्मरणशक्ती व प्रभावी वाचन यांचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या लक्षात आणून देणे.

८. ग्रंथालय हे केवळ पुस्तके उपलब्ध करून देणारे केंद्र नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त शैक्षणिक केंद्र आहे, ही भावना दृढ करणे.

बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या प्रारंभी 'एकाग्रता आणि स्मरणशक्ती' या विषयावरील भित्तीपत्रिकेचे अनावरण रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. भित्तीपत्रिकेमध्ये विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेसाठी उपयुक्त ठरणारी एकाग्रता वाढविण्याची साधने, स्मरणशक्ती प्रभावी करण्याच्या पद्धती, अभ्यासाचे नियोजन, वाचनातील सातत्य आणि सकारात्मक अध्ययन सवयी यांसंबंधी माहिती सादर करण्यात आली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना अध्ययन करताना आवश्यक असलेल्या मानसिक एकाग्रतेचे आणि स्मरणशक्तीचे महत्त्व समजण्यास मदत झाली. यानंतर 'कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन-२०२६' या विशेष ग्रंथ प्रदर्शनाचे उद्घाटन मा. जयवंतराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

'कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन-२०२६' हे या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले. प्रदर्शनामध्ये डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्यावर आधारित जुने ग्रंथ, त्यांच्या शैक्षणिक कार्याशी संबंधित साहित्य आणि त्यांच्या विचारांचा परिचय करून देणारे ग्रंथ मांडण्यात आले होते. कर्मवीरांचे जीवन, त्यांचे शैक्षणिक कार्य, रयत शिक्षण संस्थेची स्थापना व विकास, ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी त्यांनी केलेले कार्य आणि शिक्षणाच्या माध्यमातून समाजपरिवर्तनाची त्यांनी उभी केलेली चळवळ यांचा परिचय करून देणाऱ्या साहित्याचे प्रदर्शन करण्यात आले. जुने ग्रंथ विद्यार्थ्यांसाठी विशेष आकर्षण ठरले. अशा ग्रंथांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना कर्मवीरांच्या कार्याचा ऐतिहासिक संदर्भ समजण्यास मदत झाली. तसेच जुन्या ग्रंथांचे जतन, संवर्धन आणि त्यांचा शैक्षणिक उपयोग यांचे महत्त्वही विद्यार्थ्यांच्या लक्षात आले.

कार्यक्रमादरम्यान महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. विकास बर्गे यांनी उपस्थितांना भित्तीपत्रिका आणि ग्रंथ प्रदर्शनामागील संकल्पना व उद्देश स्पष्ट केला. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक जीवनाशी असलेला संबंध त्यांनी स्पष्ट केला. कर्मवीरांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा विद्यार्थ्यांनी अभ्यास करणे आवश्यक असून त्यासाठी ग्रंथालयातील उपलब्ध साहित्याचा उपयोग करावा, असे त्यांनी सांगितले. तसेच 'एकाग्रता आणि स्मरणशक्ती' या विषयावरील भित्तीपत्रिकेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी अभ्यास करताना एकाग्रता, सातत्य, योग्य वेळेचे नियोजन आणि प्रभावी वाचन या बाबींवर लक्ष केंद्रित करावे, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमास रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव (ऑडीटर) मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे आणि विभागीय अधिकारी प्रा. एन. टी. निकम यांची विशेष उपस्थिती लाभली. या प्रसंगी मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याचे महत्त्व अधोरेखित करताना "कर्मवीरांचे ग्रंथ हे कायम सर्व पिढ्यांना प्रेरणा देतील," असे मत व्यक्त केले. कर्मवीरांचे विचार आणि कार्य हे केवळ एका कालखंडापुरते मर्यादित नसून पुढील पिढ्यांनाही मार्गदर्शक ठरणारे आहे. त्यामुळे कर्मवीरांच्या जीवनकार्याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी ग्रंथांच्या माध्यमातून करावा, हा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.

कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संभाजी गावडे, उपप्राचार्य प्रा. घनश्याम गिरी यांच्यासह कला, वाणिज्य आणि विज्ञान विभागातील शिक्षक, विद्यार्थी तसेच शिक्षकेतर सेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी भित्तीपत्रिका आणि ग्रंथ प्रदर्शनाची पाहणी करून त्यामध्ये मांडण्यात आलेल्या माहिती व ग्रंथांचा लाभ घेतला. विद्यार्थ्यांनी कर्मवीरांच्या जीवनकार्याशी संबंधित ग्रंथांमध्ये विशेष रस दाखविला.

उंब्रज पंचक्रोशीतील रयत शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याची आणि विचारांची माहिती मिळावी, या उद्देशाने हे विशेष ग्रंथ प्रदर्शन दोन दिवस विद्यार्थ्यांसाठी खुले ठेवण्यात आले आहे. या कालावधीत विद्यार्थ्यांना प्रदर्शनास भेट देऊन कर्मवीरांच्या जीवनकार्यावरील विविध ग्रंथांची माहिती घेता येणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील संबंधित संदर्भ साहित्याचा उपयोग करण्यास प्रोत्साहित करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याची माहिती मिळण्याबरोबरच जुन्या ग्रंथांचे शैक्षणिक व ऐतिहासिक महत्त्व समजण्यास मदत झाली. ग्रंथ प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची उत्सुकता निर्माण झाली आणि ग्रंथालयातील उपलब्ध संदर्भ साहित्याचा वापर करण्यास प्रेरणा मिळाली. 'एकाग्रता आणि स्मरणशक्ती' या विषयावरील भित्तीपत्रिकेमुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेशी संबंधित महत्त्वपूर्ण बाबी दृश्यमाध्यमातून समोर आल्या. त्यामुळे ग्रंथालय विभागाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा आणि अध्ययन कौशल्यांना पूरक उपक्रम राबविण्याचा उद्देश साध्य झाला.

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९ व्या जयंतीनिमित्त आयोजित 'कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन-२०२६' आणि 'एकाग्रता आणि स्मरणशक्ती' भित्तीपत्रिका अनावरण हा ग्रंथालय विभागाचा विद्यार्थी-केंद्रित आणि ज्ञानवर्धक उपक्रम ठरला. कर्मवीरांच्या जीवनकार्यावरील जुन्या ग्रंथांचे प्रदर्शन, त्यातून विद्यार्थ्यांना मिळालेला ऐतिहासिक व शैक्षणिक संदर्भ, तसेच एकाग्रता व स्मरणशक्तीविषयीची माहिती यामुळे या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. कर्मवीरांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविणे आणि विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करणे या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरला. ग्रंथालय विभागाच्या वतीने आयोजित या उपक्रमास मान्यवर, महाविद्यालयीन पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय
उंब्रज

ग्रंथपाल
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय
(कला,वाणिज्य व विज्ञान)
उंब्रज,ता.कराड,जि.सातारा-४१५१०९

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

रयत शिक्षण संस्थेचे

# सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय

उंब्रज, ता. कराड, जि. सातारा

दिनांक: २३/०९/२०२६

## ग्रंथालय विभाग

## कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन फोटो



भित्तीपत्रकाचे उद्घाटनप्रसंगी
मा. प्रकाश चव्हाण-जनरल बॉडी सदस्य, र. शि. सं., सातारा
मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे- ऑडीटर, र. शि. सं., सातारा
आणि इतर मान्यवर



कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन-२०२६ चे उद्घाटनप्रसंगी
मा. जयंत जाधव -म. विकास स., उंब्रज
मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे- ऑडीटर, र. शि. सं., सातारा
आणि इतर मान्यवर





कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन पाहताना मान्यवर
मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे- ऑडीटर, र. शि. सं., सातारा
आणि इतर मान्यवर

ग्रंथपाल
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय
(कला,वाणिज्य व विज्ञान)
उंब्रज,ता.कराड,जि.सातारा-४१५१०९

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय
उंब्रज

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा



कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन पाहताना मान्यवर
मा. एन. टी. निकम – विभागीय अधिकारी , र. शि. सं., सातारा
आणि इतर मान्यवर



कर्मवीरांच्या जीवनावरील चित्रफित पाहताना मान्यवर
मा. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे- ऑडीटर, र. शि. सं., सातारा
आणि इतर मान्यवर

ग्रंथपाल
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय
(कला,वाणिज्य व विज्ञान)
उंब्रज,ता.कराड,जि.सातारा-४१५१०१

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा



कर्मवीर ग्रंथ प्रदर्शनास सहकार्य करणारे विद्यार्थी

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय उंब्रज

ग्रंथपाल
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय
(कला,वाणिज्य व विज्ञान)
उंब्रज,ता.कराड,जि.सातारा-४१५१०९

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

## कार्यक्रमास उपस्थिती असलेले विद्यार्थी आणि शिक्षक

| Sr. No. | Name of Student | Class/Dept. | Sign |
|---|---|---|---|
| 1 | Saurobh Mhernaeh THORAT | | S.M.THORAT |
| 2 | Om Sabale | | B.S |
| 3 | Om Koli | | O.M.Koli |
| 4 | Akash Kadam | | A.K |
| 5 | Atharv Kadam | | A.N.Kadam |
| 6 | Soham Sachin gade | | SSG |
| 7 | Omkar Kiratkarve | | O.A.Kiratkarve |
| 8 | Sadik Saygad | B.com II | Sadik |
| 9 | Vighnesh Jadhav | B.Com II | VJadhav |
| 10 | | | |
| 11 | | | |
| 12 | | | |
| 13 | | | |
| 14 | | | |
| 15 | | | |
| 16 | | | |
| 17 | | | |
| 18 | | | |
| 19 | | | |
| 20 | | | |
| 21 | | | |
| 22 | | | |
| 23 | | | |
| 24 | | | |
| 25 | | | |
| 26 | | | |
| 27 | | | |
| 28 | | | |
| 29 | | | |
| 30 | | | |

ग्रंथपाल
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय
(कला,वाणिज्य व विज्ञान)
उंब्रज,ता.कराड,जि.सातारा-४१५१०९

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

| Sr. No. | Name of Student | Class | Sign |
|---|---|---|---|
| 31 | Tanmay Annas. Nikum | B. A. III | Nikam |
| 32 | Niranjan Amol Hasme | B com II | N.A.Hasme |
| 33 | Omkar Hanmant nigade | B.Com II | O H Nigade |
| 34 | Prathamesh Anandu jadhav | B.com II | Jadhav |
| 35 | Deval Dhiraj thorat | B.Com I | Thorat |
| 36 | Yash LalitkumAR Bhosale | B.COM I | YLB |
| 37 | Tejas Dattatray yadav | B.Sc I | T.D.Yadav |
| 38 | Vijay Raju Padwal | B.S.C.I | Vijay |
| 39 | [illegible] | बि.ए.भाग.3 | [illegible] |
| 40 | | | |
| 41 | | | |
| 42 | | | |
| 43 | | | |
| 44 | | | |
| 45 | | | |
| 46 | | | |
| 47 | | | |
| 48 | | | |
| 49 | | | |
| 50 | | | |
| 51 | | | |
| 52 | | | |
| 53 | | | |
| 54 | | | |
| 55 | | | |
| 56 | | | |
| 57 | | | |
| 58 | | | |
| 59 | | | |
| 60 | | | |

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय
उंब्रज

ग्रंथपाल
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय
(कला, वाणिज्य व विज्ञान)
उंब्रज, ता. कराड, जि. सातारा-४१५१०९

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

| Sr. No. | Name of Student | Class | Sign |
|---|---|---|---|
| 61 | Shreya Maruti Shejval | B.Com II | S.M. Shejval |
| 62 | Sakshi Manohar Pawar | B.Com II | S.M. Pawar |
| 63 | Pooja Shivaji Satwadhir. | B.A.II | Pooja [illegible] |
| 64 | Manjula Ganpat Sankpal | B.A. II | [illegible] sankpal. |
| 65 | sakshi Jalindar Jadhav | B.A.II | S.J.Jadhav |
| 66 | vaishnavi uttam bhakare | B.A II. | Vaishnavi |
| 67 | Jagruti Sunil Chavan | B.A I | Jagruti |
| 68 | Ashlesha Bhimrao Ghadage | B.A. I | Ghadage |
| 69 | TruPati Ramesh BhoPale | B.A. I | T.R.BhoPale |
| 70 | Ankita Vinod Dixit | B.A I | A.V.Dixit |
| 71 | Mansi Rajesh Ghadage | B.com I | [illegible] Ghadage |
| 72 | Anushka Pradip Shedage | B.com I | A.P.Shedage |
| 73 | Aditi Balasaheb Desai | B.com I | A.B.Desai |
| 74 | Gayatri Vikas Mane | B.com I | [illegible] |
| 75 | Sakshi dadaso Babar | B.SC III | [illegible] |
| 76 | vaishnavi sambhaji khilare | B.SC III | [illegible] khilare |
| 77 | Ghadge Asmita Ramchandra | B.SC I | Asmita |
| 78 | samruddhi Kalpesh kashid | B.com II | [illegible] kashid |
| 79 | sakshi vishwanath Salunkhe | B.com II | S.V.Salunkhe |
| 80 | Jadhav Diksha Balkrushna | B.COM II | Jadhav |
| 81 | pawar vrushali vasant | B.com II | Vpawar |
| 82 | Mulla Ekra Sikandar | B.SC I | [illegible] |
| 83 | Prachi kishor chavan | B.com I | Prachi |
| 84 | Pratima Sotiram Gaikwad | B.Com I | Bhosale |
| 85 | Trupti Hmmatrao Barge | B.Com II | [illegible] |
| 86 | Jiya Salim Mulla | B.Com II | [illegible] mulla. |
| 87 | Ghadage Bhumika Machindra | B.A I | Bhumika |
| 88 | shreya Amit Late | B.A I | S.A.Late |
| 89 | | | |
| 90 | | | |

ग्रंथपाल
सौ.मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय
(कला,वाणिज्य व विज्ञान)
उंब्रज,ता.कराड,जि.सातारा-४१५१०९

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय उंब्रज

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

| Sr. No. | Name | Class/Dept. | Sign |
|---|---|---|---|
| 1 | Dr. J. A. Mulani | English | [signature] |
| 2 | Prof. Salunkhe M. S | English | [signature] |
| 3 | Prof. Tupe A. P. | Commerce | [signature] |
| 4 | Prof. Desai P. S. | Commerce | [signature] |
| 5 | Dr. Patil V. P. | Marathi | [signature] |
| 6 | Dr. Nimbalkar K. M. | Hindi | [signature] |
| 7 | Jamdade N. P. | History | [signature] |
| 8 | YADAV R. S. | ECONOMICS | R. S. YADAV |
| 9 | Deshmukh R. V. | Marathi | [signature] |
| 10 | Guray P. V. | ~~P H~~ Science | [signature] |
| 11 | Patane P. S. | — 11 — | [signature] |
| 12 | Jadhav M. S. | — 11 — | M. S. Jadhav. |
| 13 | Tate M. A. | — 11 — | TateM. |
| 14 | | | |
| 15 | | | |
| 16 | | | |
| 17 | | | |
| 18 | | | |
| 19 | | | |
| 20 | | | |
| 21 | | | |
| 22 | | | |
| 23 | | | |
| 24 | | | |
| 25 | | | |
| 26 | | | |
| 27 | | | |
| 28 | | | |
| 29 | | | |

ग्रंथपाल
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय
(कला, वाणिज्य व विज्ञान)
उंब्रज, ता. कराड, जि. सातारा-४१५१०९

सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय
उंब्रज

प्र. प्राचार्य
सौ. मंगलताई रामचंद्र जगताप
महाविद्यालय, उंब्रज,
ता. कराड, जि. सातारा

विजयी मैदान

# 'कर्मवीरांचे ग्रंथ सर्व पिढ्यांना कायम प्रेरणा देतील' : डॉ. राजेंद्र मोरे

उंब्रज/प्रतिनिधी

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षणमहर्षी व पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९व्या जयंतीनिमित्त सौ. मंगलताई रामचंद्र जगताप महाविद्यालय, उंब्रज येथील ग्रंथालय विभागाच्या वतीने विविध शैक्षणिक व साहित्यिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून कर्मवीरांच्या विचारांचा आणि कार्याचा जागर करण्यात आला.

बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित कार्यक्रमात 'एकाग्रता आणि स्मरणशक्ती' या विषयावरील भित्तीपत्रिकेचे अनावरण रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडीचे सन्माननीय सदस्य श्री. प्रकाश चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या अभ्यासातील एकाग्रता वाढविण्यासोबतच स्मरणशक्ती विकसित करण्याच्या दृष्टीने या भित्तीपत्रिकेत उपयुक्त माहिती देण्यात आली.



याचबरोबर ग्रंथालय विभागाच्या वतीने 'कर्मवीर ग्रंथ प्रदर्शन-२०२६' या विशेष ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनात कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्यावर आधारित जुने व दुर्मीळ ग्रंथ, त्यांच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची माहिती देणारे साहित्य तसेच कर्मवीरांच्या विचारांचा परिचय करून देणारे विविध ग्रंथ प्रदर्शित करण्यात आले. प्रदर्शनाचे उद्घाटन मा. जयवंतराव जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. विकास बर्गे यांनी भित्तीपत्रिका व ग्रंथ प्रदर्शनामागील संकल्पना आणि उद्देश स्पष्ट केला. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन मानून ग्रामीण व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली. त्यांच्या विचारांचा आणि कार्याचा अभ्यास विद्यार्थ्यांनी ग्रंथांच्या माध्यमातून करावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना डॉ. राजेंद्र मोरे यांनी कर्मवीरांच्या साहित्याचे महत्त्व अधोरेखित करताना, ''कर्मवीरांचे ग्रंथ हे केवळ इतिहासाची नोंद करणारे नसून सर्व पिढ्यांना विचार, शिक्षण आणि सामाजिक बांधिलकीची प्रेरणा देणारे आहेत,'' असे प्रतिपादन केले.

ग्रंथ प्रदर्शनाला विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच शिक्षणप्रेमी नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कर्मवीरांच्या जीवनकार्याची ओळख करून देणारे दुर्मीळ साहित्य एकाच ठिकाणी पाहण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळाल्याने या उपक्रमाचे विशेष कौतुक करण्यात आले.